International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 2 January – February - 2026

# आधुनिक मराठी साहित्यात सामाजिक सुधारणा आणि मानवी परिवर्तन: उर्मिला पवार यांच्या 'चौथी भिंत' या कथासंग्रहाच्या अनुषंगाने

**पूजा भालचंद्र गावकर[1], डॉ. सुनीता उम्रस्कर[2]**

*[1]संशोधक विद्यार्थी, मराठी अध्ययनशाखा,*
*शणै गोंयबाब भाषा आणि साहित्य महाशाळा, गोवा विद्यापीठ.*
*[2]विद्यावाचस्पती मार्गदर्शक, सहयोगी प्राध्यापक, मराठी अध्ययनशाखा,*
*शणै गोंयबाब भाषा आणि साहित्य महाशाळा, गोवा विद्यापीठ.*
*Corresponding Author – पूजा भालचंद्र गावकर*

**DOI - 10.5281/zenodo.18654128**

**प्रस्तावना:**

आधुनिक मराठी साहित्य हे समाजातील बदलत्या वास्तवाचे, संघर्षाचे आणि मूल्यांचे संवेदनशील प्रतिबिंब आहे. स्वातंत्र्योत्तर काळात उदयास आलेल्या या साहित्यात सामाजिक अन्याय, जातीव्यवस्था, स्त्रीदमन, वर्गसंघर्ष आणि मानवी अस्मितेचे प्रश्न ठळकपणे मांडले गेले. विशेषतः दलित साहित्यातून समाजातील उपेक्षित घटकांचे अनुभव केंद्रस्थानी आणून सामाजिक सुधारणेची आणि मानवी परिवर्तनाची जाणीव जागृत केली.

दलित साहित्य लेखनाच्या संदर्भात उर्मिला पवार यांचे साहित्य महत्त्वाचे मानले जाते. त्यांच्या 'चौथी भिंत' या कथासंग्रहात दलितांच्या जीवनातील विशेषतः दलित स्त्रीच्या जीवनातील दाहक वास्तव, मानसिक संघर्ष, सामाजिक बंधने आणि आत्मभानाची प्रक्रिया प्रभावीपणे व्यक्त झाली. या कथा केवळ स्त्रीच्या दुःखाचे वर्णन न करता समाजातील अन्यायकारक रचना उघड करतात आणि परिवर्तनाची गरज अधोरेखित करतात.

'दलित म्हणून आणि स्त्री म्हणून असा दुहेरी संघर्ष करणाऱ्या स्त्रियांचे आत्मभान कसे हळूहळू जागे होत गेले, हे या काथासंग्रहातून जाणवते.'[१] सदर कथासंग्रहाच्या अनुषंगाने आधुनिक मराठी साहित्यातील सामाजिक सुधारणा आणि मानवी परिवर्तन यांचा अभ्यास करण्यात आला आहे. 'चौथी भिंत' मधील व्यक्त होणारी सामाजिक जाणीव, स्त्रीची आत्मओळख आणि मानवी मूल्यांची पुनर्स्थापना या दृष्टीने हा कथासंग्रह आधुनिक मराठी साहित्यातील एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरतो.

***कीवर्ड्स: आधुनिक मराठी साहित्य, सामाजिक सुधारणा, मानवी परिवर्तन आणि दलित समाज जीवन.***

**ऐतिहासिक पार्श्वभूमी:**

'जागतिकीकरणानंतरचे मराठी साहित्य' या पुस्तकात प्रा. महेंद्र भवरे यांच्या 'नव्वदोत्तर दलित साहित्य' या लेखात दिलेल्या माहितीनुसार भारतात १९व्या शतकात प्रबोधन युगाची सुरुवात झाली. परंपरेने संघर्ष करीत आलेल्या शोषित दलित समाजाला बंधनातून, सामाजिक दडपणातून मुक्त करण्याचे कार्य महात्मा फुले यांनी केले. त्यांच्याच आश्रयाखाली असलेल्या त्यांच्याच पत्नी सावित्रीबाई फुले यांनीही स्त्रियांच्या प्रगतीसाठी कार्य केले. शिक्षणाचे महत्त्व पटवून देऊन आपल्या अधिकाराची

जाणीव लोकांना करून दिली व प्रबोधनाची चिंगारी पेटवली. त्यांचीच प्रेरणा घेऊन पुढे आधुनिक काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 'शिका, संघटीत व्हा व संघर्ष करा' हा मूलमंत्र देऊन लोकांना जीवनाकडे पाहण्याची दूरदृष्टी दिली. दलित पँथर, स्त्रीमुक्ती चळवळ, अस्पृश्यता उद्धाराची चळवळ, सामाजिक उत्थानाचे लढे, देशाला दिलेली राज्यघटना, राज्यघटनेची मूल्यव्यवस्था यातून नवविचार परंपरा आकारास आली. लोकशाही व्यवस्था निर्माण झाली व राजकीय, सामाजिक, आर्थिक क्षेत्रात स्थित्यंतरे घडली. शैक्षणिक स्थरावर दलित समजाला प्राधान्य दिले गेले. नवशिक्षित पिढी वाचायला, लिहायला लागली. आपले विचार, प्रश्न साहित्यातून मांडू लागली. त्या काळी लिहिले गेलेले साहित्य हे नकार, विद्रोह, संघर्षाच्या पायावर उभे होते. मात्र त्यात आत्मशोध, आत्मस्वर तीव्र असल्याचे दिसते. औद्योगिकीकरण, तंत्रज्ञान, उदारीकरण, नागरीकरण यामुळे सामाजिक स्थित्यंतरे घडली. परंपरा व आधुनिकता अशा द्वंद्व स्थितीत लोक जीवन जगू लागले. १९९० नंतरच्या जागतिकीकरणाचा दलित समाजावर प्रभाव झाला. त्यांचे राहणीमान, जीवनशैली बदलली. या बदललेल्या स्थितीचे प्रतिबिंब साहित्यातून उमटू लागले. याकाळात अस्पृश्यता, गुलामगिरी याला विरोध करून व्यक्तिस्वातंत्र्य, स्वावलंबन, स्वधिकार, मानवी अधिकार असे प्रबोधनात्मक विषय साहित्यातून येताना दिसतात.

२०२२ साली प्रकाशित झालेल्या लेखिका उर्मिला पवार यांच्या 'चौथी भिंत आणि इतर कथा' या कथासंग्रहात बौद्ध धर्माचे प्रतिक असलेले धम्मचक्र, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार, स्वव्यवसाय, शिक्षित दलित स्त्री, दलित स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायांवर विद्रोह, भारतीय तसेच पाश्चात्य संस्कृतीत असलेले जातीव्यवस्थेचे वर्तुळ, भारतीय संविधानात दलित समाजासाठी देण्यात आलेले आरक्षण, अस्पृश्यतेविरुद्धचा प्रतिकार आणि नवीन सामाजिक ओळखीचे चिन्ह ठरलेले शुभ्र वस्त्र जे पवित्रता, शुद्धता, प्रतिष्ठा आणि सत्तेचे प्रतिक मानले जाते व प्रबोधन असे अनेक विषय केंद्रस्थानी ठेऊन यात कथांचे लेखन झाले आहे. बुद्ध, आंबेडकर व फुले यांच्या वारशावर या कथा उभारलेल्या आहेत. त्यांच्या प्रेरणेतून घडत गेलेले वैयक्तिक तसेच सामूहिक परिवर्तन याचा आढावा घेत या कथांचे लेखन झालेले दिसते.

**समाज आणि मानव: परस्पर संबंध:**

समाजशास्त्रज्ञ **हॅरी जॉन्सन** यांच्या मतानुसार 'समाजशास्त्र हे सामाजिक समुहाच्या संबंधाचे शास्त्र आहे'[२] तर **सारांश** यांच्या मते 'व्यक्ती-व्यक्तीमधील पारस्पारिक संबंधाचे आणि पारस्पारिक क्रियांचे अध्ययन करणारे शास्त्र म्हणजे समाजशास्त्र होय.'[३]

''सामाजिक मानसशास्त्र' हे मानसशास्त्राचा सिद्धांत आणि संकल्पनांचा वापर करून व्यक्ती आणि त्याचा सामाजिक जगाशी असलेला संबंध समजून घेत असते.''[४] याचाच अर्थ समाजात घडणाऱ्या प्रत्येक घटनेचा संबंध मानवाशी आहे व या घटनांचा परिणाम त्याच्या वैयक्तिक, सामुहिक, मानसिक, शारीरिक स्थितीवर होत असतो. सामाजिक समस्या, घटना, प्रसंग या मानसिक समस्यांना कारणीभूत ठरत असतात. त्यामुळे समाज आणि मानव यामधील परस्पर संबंध जाणून घेताना समाजशास्त्रीय तसेच मानसशास्त्रीय दृष्टीकोन महत्त्वाचा ठरतो.

वर मांडण्यात आलेल्या संकल्पना आणि सिद्धांतांच्या आधारे 'चौथी भिंत' या काथासंग्रहांचा प्रस्तुत संशोधन लेखात अभ्यास करण्यात आला आहे.

**दलित स्त्रीचे सामाजिक व मानसिक वास्तव चित्रण:**

उर्मिला पवार यांच्या प्रत्येक कथेतील पात्र दलित समाजातील व्यक्तिची कथा आणि व्यथा दर्शविते. त्यांची

**'कवच'** ही स्त्रीकेंद्री कथा आहे. जीवनाच्या वाट्याला दारिद्र्य आलेल्या इंदिराचे जीवनदर्शन यात घडते. आंब्याचा व्यवसाय करण्यासाठी घरातून बाहेर पडणारी स्त्री यात दिसते. आर्थिकरित्या स्वतंत्र असलेल्या स्त्रीचे जीवन यात मांडण्यात आले आहे. तर त्यांच्या **'शल्य'** या कथेत चार मुली झाल्याचे शल्य आईच्या मनात म्हणजेच ज्योतीला असलेले दिसते. यासाठी घरच्यांकडून तिच्यावर अनेक मानसिक अत्याचार होताना दिसतात. आजच्या प्रबोधन काळातही भारतीय परंपरेत मुलगा हाच कुटुंबाचा 'वंश' मानला जातो. त्यामुळे आधुनिक युगातही स्त्रियांना या सामाजिक प्रश्नांना आणि समस्यांना सामोरे जावे लागते. तर **'न्याय'** ही कथा 'अनौरस'सारख्या विषयांवर प्रकाश टाकते. केळी विकण्याचा व्यवसाय करणाऱ्या पार्वती म्हणजेच पारूवर बलात्कार होतो. यातून ती गर्भ धारण करते व पुढे त्या बाळाला स्वतः स्वतंत्र वाढविण्याचा निर्णय घेते. वरील कथांचा आढावा घेता आजची स्त्री कुटुंबाचा व मुलांचा सांभाळ करण्यासाठी समर्थ आहे. लेखिका याचे उदाहरण पात्रांच्या माध्यमातून देतात. आजची स्त्री आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी आहे. मात्र अशावेळी तिला समाजात अनेक टिकांना सामोरे जावे लागते याचाही परामर्श त्या घेतात. **'वर्तुळ'** ही कथा जातिव्यवस्थेच्या बंधनात अडकलेल्या नायिकेचे जीवन चित्रित करते. जातिव्यवस्थेमुळे नेत्राच्या मनातील प्रणयभावना दडपलेल्या आहेत. पाश्चात्य देशात हे बंधन नसेल या विचाराने ती तेथील युवकाकडे लग्न करण्याचा विचार करते. मात्र कथेच्या शेवटी पाश्चात्य संस्कृतीतही लग्न परंपरेत कुळ, जातीचे वर्तुळ असल्याचे तिच्या निदर्शनात येते. अशा विविध सामाजिक बंधनामुळे, नियमांमुळे व स्त्रियांवर होणाऱ्या टीकांमुळे त्यांचे होणारे मानसिक कुचंबण या कथां अधोरेखित करतात. तर **'सुटे गिऱ्हान'** ही कथा जन्मानेच ठेंगणी होण्याचा श्राप लागलेल्या सुमीचे व्यथित जीवन दर्शविते. यामुळे प्रणयभावनेतून ती वंचित राहते. या तिच्या मानसिक स्थितीचे दर्शन या कथेत घडते. तसेच 'एखाद्या पुरुषाला बलात्कार करण्यासाठी लहान वा अपंग मुलगी चालते. परंतु लग्नासाठी पूर्ण स्त्री हवी असते' अशी तीव्र वास्तवता लेखिका या कथेद्वारे परखडपणे मांडतात. **'माझी माणसं'** या कथेत कमळीला **पॅरॉनॉइड स्किझोफ्रेनिया** या मानसिक विकाराने ग्रासले आहे. यामुळे संशयग्रस्त वागणे, आक्रमक होणे यासारखी लक्षणे तिच्यात दिसतात. या तिच्या परिस्थितीमागे तिचा नवरा कारणीभूत असतो. आपला विवाहबाह्य संबंध लपवण्यासाठी तो कमळीला विविध पद्धतीने वेडे ठरवतो. यामुळे ती मानसिकरीत्या खालावत जाते. **बर्जेस** या मानसशास्त्रज्ञाने सुखी दाम्पत्यांची काही वैशिष्टे सांगितलेली आहे. 'एकमेकांचा विचार करणे, दुसऱ्यासाठी त्याग करणे, दुसऱ्याच्या सहवासासाठी उत्सुक असणे, भावनात्मकदृष्ट्या एकमेकांवर अवलंबून असणे, विश्वास असणे.'[५] मात्र यांचा कमळीच्या जीवनात पूर्णपणे अभाव दिसतो व याचाच परिणाम त्यांच्या नात्यावर व तिच्या मानसिकतेवर झालेला आहे. लेखिका स्त्रीच्या सामाजिक तसेच मानसिक स्थितीचे वर्णन येथे करताना दिसतात. तर त्यांच्या **'बाईची जात'** या कथेद्वारे बाईच्या जातीला लावले जाणारे वांझ, वांझोटी, सवत अशा अनेक संकल्पना मांडण्यात आल्या आहेत.

दलित स्त्रीचे जीवन जात, वर्ग आणि लिंग या तीन पातळ्यांवर घडत असते. या तीन स्तरांवर ती जीवनाचा अनुभव घेत असते. जातीय अन्याय, अस्पृश्यता, आर्थिक दारिद्र्य, शिक्षणाचा अभाव, कौटुंबिक जबाबदारी यांचे ओझे सहन करावे लागते. तसेच मानसिक पातळीवर अपमानाची जाणीव, भीती, दडपण असा भावनिक संघर्ष ती करत असते. दलित स्त्रीच्या जीवनातील मानसिक कोंडी आणि आत्मभानाची जाणीव प्रभावीपणे व्यक्त झाली आहे. कथेतील काही स्त्रीपात्रे स्वतःसाठी स्वतंत्र निर्णय घेताना

दिसतात तर काही अजून सामाजिक व मानसिक बंधनात अडकलेल्या आहेत. मात्र स्त्री म्हणून लेखिका त्यांच्यावर होणाऱ्या अन्यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करतात. स्त्रीने स्त्रीसाठी पुकारलेले बंड त्यांच्या कथातून जाणवते.

**सामाजिक अन्यायाविरुद्धची जाणीव आणि प्रतिकाराची भूमिका:**

उर्मिला पवार यांच्या कथांमधून दलितांच्या मुख्यतः स्त्रीच्या जीवनावर लादल्या जाणाऱ्या सामाजिक अन्यायाची तीव्र जाणीव प्रकर्षाने दिसते. कथांमधील काही पात्रे सुरुवातीला अन्याय सहन करणारी वाटली तरी त्यांच्या अंतरमनात असंतोषाची ठिणगी पेटलेली दिसते. अपमान, उपेक्षा व अवहेलना यांच्या अनुभवातून त्यांना सामाजिक संरचनेचे भान येते. ही जाणीव त्यांच्या आत्मसन्मानाला जागृत करते. दलित समाजाने सहन केलेल्या अनेक अन्यावर या कथा प्रकर्षाने विरोध करतात. **'चौथी भिंत'** या पहिल्याच कथेद्वारे श्रद्धा, प्रेरणा, आदर्श भिंतीवर चिकटवण्यात येणाऱ्या फोटोत नसून मनाच्या गाभाऱ्यात असते याची जाणीव लेखिका करून देतात. यातून दलित समाजातील लोक कोणत्या देवाला पूजतात? या प्रश्नावर त्या पूर्णविराम लावतात. तसेच बौद्ध धर्म स्वीकारून डॉ. आंबेडकरांनी एकात्म व शांतीला प्राधान्य दिले. बौद्ध धर्मात प्रगती आणि जीवनाचे प्रतिक असलेले धम्मचक्र याची १४ ऑक्टोबर १९५६ रोजी स्थापना झाली. या दिवसाला 'धम्मचक्र प्रवर्तन दिवस' म्हणून ओळखले जाते. या ऐतिहासिक पार्श्वभूमीवर आधारून उर्मिला पवार यांनी **'धम्मचक्र'** नावाची कथा लिहिली. ही कथा दलित समाजात असलेल्या धम्मचक्र या प्रतीकाचे महत्त्व पटवून देते. मानवाचे जीवनचक्र मातीत सुरू होऊन मातीतच संपते याची जाणीव त्या करून देतात. तर **'कार्यकर्ता' आणि 'धिंड'** या कथांमधून राजकीय कार्यकर्त्यांचे जीवन मांडण्यात आले आहे. या लोकांकडून सामान्य माणसांवर होणाऱ्या परिणामाचे दस्ताऐवज या कथा देतात. तसेच सुख, सोयी, सुविधापासून वंचित असलेला दलित समाज यात दिसतो व यामागे आपलीच माणसे कारणीभूत आहेत याची खंत यात लेखिका व्यक्त करतात. माणूस कुठे चुकतो याचीही जाणीव त्या करून देतात. लेखिका या कथांद्वारे राजकीय कार्यकर्त्यांकडून दलितांवर होणाऱ्या अनेक अन्यायावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करतात. पुन्हा त्यांची **'वेगळी'** ही कथा वेगळा विषय घेऊन पुढे येते. भारतीय संविधानात मागासवर्गीयांना आरक्षण देण्यात आले होते. शिक्षण, नोकरी, राजकीय क्षेत्रात त्यांना राखीव जागा आहे. या पार्श्वभूमीवर या कथेचे कथानक उभे राहते. येथे लेखिका दलित समुहातील लोकांना स्वअधिकाराची, स्वहक्काची जाणीव करून देतात.

**मानवी आत्मभान व परिवर्तनाची प्रक्रिया:**

उर्मिला पवार यांच्या 'चौथी भिंत' या कथासंग्रहात दलित स्त्रीच्या जीवनप्रवासातील मानवी आत्मभानाची जडणघडण आणि त्यातून घडणारी परिवर्तनाची प्रक्रिया सूक्ष्मपणे उलघडून दाखवली आहे. सामाजिक अन्याय, अपमान आणि उपेक्षेच्या अनुभवातून दलितांना स्वतःच्या अस्तित्वाचे भान येते. त्यांच्या मनात हळूहळू आत्मभान विकसिक होत असताना दिसते. ते दीर्घकाळाच्या शोषणाच्या अनुभवातून, अंतर्मुख चिंतनातून आणि सामाजिक वास्तवाच्या जाणीवेतून आकार घेते. लेखिका कथांद्वारे मानवी परिवर्तनाची प्रक्रिया स्पष्ट करत आधुनिक मराठी साहित्यात सामाजिक सुधारणेचा आशय अधिक व्यापक करतात. त्यांच्या **'प्रबोधन'** या कथेचे येथे उत्तम उदाहरण म्हणून घेता येते. यात सुरुवातीला पुरुषसत्ताक संस्कृतीत अडकलेल्या उच्चशिक्षित सुशीला कोरे या नायिकेचे जीवनचित्रण रेखाटले आहे. व्यक्ती म्हणून तिचे

असलेले स्वातंत्र्य हिरावून घेण्याचा प्रयत्न तिचा नवरा कोरेसाहेब करतात. मात्र दलित शिक्षित स्त्रियांची मुलाखत घेण्यासाठी आलेल्या महिलेच्या प्रश्नांनी सुशीलाच्या विचारात परिवर्तन घडते. एक स्त्री व्यक्ती असून तिचे स्वतंत्र जीवन आहे याची जाणीव तिला होते. यावेळी नवऱ्याच्या अनेक नकारांना, विवादांना तिला सामोरे जावे लागते. मात्र शेवटी काही कारणामुळे कोरेसाहेबांच्या विचारांतही परिवर्तन घडते व सुशीलाला आपल्या मनातील इच्छा, आकांक्षा पूर्ण करण्यास ते परवानगी देतात. येथे कोरे दांपत्यांच्या विचारात परिवर्तन घडताना दिसते. स्त्री-पुरुष समान असून त्यांना आपल्या आकांक्षा स्वतःच्या इच्छेनुसार पूर्ण करण्याचा अधिकार आहे. असे प्रबोधनात्मक विचार लेखिका या कथेद्वारे मांडतात. तर त्यांच्या **'बस्ता'** ही कथा दलित समाजात असलेल्या शुभ्र वस्त्राचे विशेष सांगते. सुरुवातीला परंपरागत जातीय व्यवस्थेत दलित समाजाला प्रतिष्ठेची चिन्हे वापरण्यावर अनेक बंधने घालण्यात आली होती. अशा परिस्थितीत या समाजात शुभ्र वस्त्र धारण करणे हे केवळ वैयक्तिक आवड न राहता आत्मसन्मान, प्रगती आणि परिवर्तनाचे प्रतिक ठरते. या कथेत आलेल्या लग्न परंपरेतून ही कथा घडत जाते. दलित समाज दांपत्य लग्नविधीसाठी शुभ्र वस्त्र परिधान करण्याच्या निर्णय घेते. यातून सुख, शांती, प्रतिष्ठेचे प्रतिक दिसून येते. येथे प्रगतीच्या मार्गाने घेतलेला एक टप्पा असे म्हणता येतील.

**सामाजिक सुधारणेला दिशा देणारे साहित्य:**

'चौथी' भिंत' या कथासंग्रहातून सामाजिक सुधारणेची जाणीव निर्माण होत असून मानवी मूल्यांची पुनर्स्थापना घडते. आत्मसन्मान, समानता आणि स्वातंत्र्य यांचा आग्रह कथांमधून सातत्याने व्यक्त होतो. महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारप्रणालीतून प्रेरित झालेले दलित साहित्य समाजातील शोषित घटकांचा आवाज बनले. उर्मिला पवार यांचे साहित्य स्त्रीच्या आत्मभानाला बळ देत सामाजिक सुधारणेचा मार्ग स्पष्ट करते. मात्र येथेच न थांबता प्रश्न विचारण्याची, अन्यायाला नकार देण्याची आणि परिवर्तनाची जाबाबदारी स्वीकारण्याची प्रेरणा देते. यासाठी 'चौथी भिंत', 'धम्मचक्र', 'बस्ता', 'प्रबोधन', 'वेगळी' या कथांचा येथे प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. या कथांच्या माध्यमातून लेखिका माणुसकीची जाणीव आणि मनातील श्रद्धेची जाणीव करून देतात. दलित समाजात असलेल्या प्रगती व प्रतिष्ठेच्या प्रतीकांची जाणीव करून देतात. तसेच संविधान स्थापनेच्या वेळी दलित समाजातील लोकांना दिलेल्या अधिकारांची जाणीव त्या करून देतात. आजच्या काळात साहित्यातून येणाऱ्या अशा अनेक नवीन प्रवाहांचे दाखले या कथासंग्रहात सापडतात.

**समारोप:**

'चौथी भिंत' या कथासंग्रहातील कथा दलित मानवाच्या वेदना, संघर्ष, अपमान आणि आत्मशोध मांडतात. तसेच सामाजाने उभ्या केलेल्या जातीय, लैंगिक आणि मानसिक भिंती स्त्रीच्या विकासाला कशा अडथळा ठरतात, हे या कथांमधून स्पष्ट होते. कथांमधील स्त्री पात्रे केवळ पिडीत न राहता आत्मभान प्राप्त करून अन्यायाविरूद्ध उभ्या राहतात. घर, समाज, जात आणि परंपरा यांनी लादलेल्या बंधानांवर प्रश्न उपस्थित केला जातो. त्यामुळे या कथा सामाजिक सुधारणेची जाणीव निर्माण करतात आणि माणूस म्हणून जगण्याचा अधिकार अधोरेखित करतात.

**निष्कर्ष:**

१. आधुनिक मराठी साहित्य समाजाच्या वास्तवाशी थेट संवाद साधत सामाजिक अन्यायावर प्रकाश टाकते.

२. मानवी आत्मभान जागृत होऊन व्यक्तिगत व सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया सुरू होते.

३. शुभ्र वस्त्रासारखी व धम्मचक्रासारखी प्रतीके दलित समाजात आत्मसन्मान व प्रगतीचे द्योतक ठरतात.

४. आजचा दलित समाज विविध क्षेत्रात अग्रेसर आहे.

५. स्त्री एक व्यक्ती असून तिला स्वतंत्र जीवन जगण्याचा अधिकार आहे.

६. आजची स्त्री आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी आहे.

**संदर्भग्रंथ:**

**१.** कोत्तापल्ले, नागनाथ. भगत दत्ता. *जागतिकीकरण नंतरचे मराठी साहित्य.* सायन पब्लिकेशन्स प्रा.लि. तिसरा मजला, स्वोजस हाउस ११५९, सदाशिव पेठ, पुणे, ४११ ०३०. पा. क्र. ३५४

**२.** दुधे, संजय. निंबार्ते, जी.एन.*समाजशास्त्र परीचय.* हिमालय पब्लिशिंग हाउस प्रा.लि.'रामदूत', डॉ. भालेराव मार्ग, गिरगाव, मुंबई-४०० ००४, पा. क्र. ३

**३.** दुधे, संजय. निंबार्ते, जी.एन.*समाजशास्त्र परीचय.* हिमालय पब्लिशिंग हाउस प्रा.लि.'रामदूत', डॉ. भालेराव मार्ग, गिरगाव, मुंबई-४०० ००४, पा. क्र. ३

**४.** Davey, Graham. *ENCYCLOPEDIC DICTIONARY OF PSYCHOLOGY.* Hodder Arnold, Hodder Education, Hodder Headline Group, 338 Euston Road, London NW1 3BH, 2006. pg. 233

**५.** कामत, साधना.*दैनंदिन जीवनातील मानसशास्त्र.* मनमोहन भटकळ पॉप्युलर बुक डेपो २१७, राजा राममोहन रॉय मार्ग, मुंबई ४०००४. पा.क्र.३२,३३

**साधानग्रंथ:**

१. पवार, उर्मिला. *चौथी भिंत.* यशोधन पाटील शब्द पब्लिकेशन ए २०३, जनकल्याण, वझिरा नाका, बोरीवली, मुंबई ४०० ०९१, २०२२